Volume : 1 | Issue : 4 | April 2012 ISSN - 2250-1991

Research Paper Economics

# केंद्रीय अर्थसंकल्प 2011–12 व 2012–13 चे तुलनात्मक अध्ययन
# Kendriya Aarthsankalp 2011-12 and 2012-13 ke Tulnatmak Adhayan

* Dr. Pawar Ashok S.** Dr. Sunita J. Rathod
*** Shri. Budhwant R.G.

* Assit. Prof. Economics Dept., Dr. B.A.M.University Aurangabad

** Maharashtra education, Service group-B, DIET Dist. Jalna

*** Research student, Dept. of Economics, Dr.B.A.M. University, Aurangabd

ABSTRACT

अर्थसंकल्प मांडत असतांना किंवा अर्थसंकल्पाचा अभ्यास करत असतांना अर्थसंकल्पाची पार्श्वभूमी अगोदर जाणुन घ्यावी लागते. त्याचबरोबर अर्थसंकल्पामध्ये कोणत्या गोष्टीवर लक्ष दिले आहे. तसेच कोणत्या करात वाढ केली आहे आणि कोणत्या क्षेत्रावर जास्त खर्च करण्यात आला आहे. तसेच कोणत्या क्षेत्राकडे दुर्लक्ष करण्यात आले या गोष्टीवर अगोदर भर द्यावा लागतो. तेव्हाच सुधारित अर्थसंकल्प मांडता येतो.

अर्थसंकल्पाचा अभ्यास करत असतांना मागच्या वर्षी कोणत्या क्षेत्रावर किती खर्च करण्यात आला ही पार्श्वभूमी अगोदर लक्षात घ्यावी लागते त्यामध्ये अर्थसंकल्प म्हणजे काय? हे सांगण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आलेला आहे. तसेच अर्थसंकल्पाचा अर्थ काय आहे. त्याचबरोबर अर्थसंकल्पाच्या व्याख्या सांगण्यात आलेल्या आहे. त्याचबरोबर अर्थसंकल्प 2011–12 व अर्थसंकल्प 2012 – 13 यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. त्याचबरोबर करामध्ये झालेली तरतुद आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर त्या करांचा झालेला परिणामासंदर्भात देखील चर्चा करण्यात आली आहे. तसेच अर्थसंकल्प 2012 – 13 च्या अर्थसंकल्पात प्राप्तीकरामध्ये कोणत्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत त्यासंदर्भात देखील विवेचन केलेले आहे. एवढी माहिती प्रस्तुत शोध निबंधात दिलेली आहे.

Keywords :

भारतातील अर्थसंकल्पीय प्रक्रिया स्वातंत्र्यापुर्वीच सुरू झाली आहे. ईस्ट इंडियाकडुन भारताची सत्ता ब्रिटीश पार्लमेंटकडे गेल्यानंतर लगेचच दोन वर्षानंतर 7 एप्रिल 1860 रोजी पहिला अर्थसंकल्प मांडण्यात आला. जेम्स विलसन या पहिल्या वित्त सदस्याने तो मांडला होता. स्वातंत्र्यापुर्वीच्या अंतिम सरकार मधील सदस्य लियाकत अली खान यांनी 1947 –48 चा अर्थसंकल्पात मांडण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले वित्त मंत्री श्री. आर. के. शणमुखम चेट्टी यांनी पहिला अर्थसंकल्प 26 नोव्हेंबर, 1947 रोजी मांडला.

कोणत्याही वर्षाच्या अर्थसंकल्पात सरकारी जमा खर्चाचे तीन वर्षाचे आकडे दिलेले असतात.

1. चालु वित्तिय वर्षाचे अर्थसंकल्पातील व संशोधित अंदाज.

2. आगामी वित्तिय वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज.

3. मागील वित्तिय वर्षाचे प्रत्यक्ष वर्षाचे आकडे.

भारतामध्ये दरवर्षी फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी 28 किंवा 29 फेब्रुवारी साधारणतः अर्थसंकल्प संसदेत मांडला जातो. साधारणतः त्याच्या एक दिवस आधी चालु वर्षाची भारताची आर्थिक पाहणी संसदेत मांडली जाते. 25/26 फेब्रुवारीला पुढील आर्थिक वर्षासाठी रेल्वेचा अर्थसंकल्प मांडला जातो. 1921 च्या ॲकवर्थ समीतीच्या शिफारशीनुसार 1924 पासून रेल्वेचा अर्थसंकल्प साधारण अर्थसंकल्पापासून वेगळा मांडला जातो.

मार्चचा महिना दोन्ही अर्थसंकल्पांना संसदेची कायदेशीर मान्यता मिळवण्यासाठी राखुन ठेवलेला असतो. मात्र अशी फायदेशीर मान्यता मिळवण्यासाठी ब–याचदा मे महिना उजाडतो. भारत सरकारचे आर्थिक वित्तिय वर्ष दरवर्षी 1 एप्रिल पासून सुरू केले होते. अर्थसंकल्प संमत झाल्यानंतर तो 1 एप्रिल ते 31 मार्च या वित्तीय वर्षासाठी कार्यान्वित केला जातो. 1 एप्रिल ते 31 मार्च असे वित्तीय वर्ष मानण्यास सूरूवात 1867 पासून झाली. त्यापुर्वी 1 मे ते 30 एप्रिल असे वित्तिय वर्ष मानले जाते. पुढे मे 1984 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या एल. के. झा. समितीला वित्तीय वर्षाच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यास सांगण्यात आले. या समितीने वित्तिय वर्ष 1 जानेवारी पासून गृहित धरण्याची शिफारस केली होती. भारत सरकारने मात्र ही शिफारस विविध कारणांमुळे काही स्विकारली नाही.

लघुशोध निबंधाची संशोधन पध्दत :–

प्रस्तुत शोध निबंधाची संशोधनामध्ये अर्थसंकल्पाचे विवेचन व अर्थसंकल्प 2012–13 चे तुलनात्मक अभ्यास केला आहे. त्यासाठी केवळ दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केलेला आहे.

संशोधनाची उदिष्टये

1. अर्थसंकल्प 2011 – 2012 व 2012 – 2013 यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. महसुली उत्पन्न व भांडवली उत्पन्न यांचा अभ्यास करणे.
3. अर्थसंकल्पातील योजना खर्च योजनाबाहय खर्च यांचा अभ्यास करणे.
4. महसूली तुट, वित्तीय तुट आणि प्राथमिक तुट यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

अर्थसंकल्पाचा अर्थ

अर्थसंकल्पाला इंग्रजीमध्ये ठनकहमज असे म्हणतात. ठनकहमज हा शब्द ठनक. हमजजमम या फेंचशब्दापासून निर्माण झाला. त्याचा अर्थ 'चामडयांची पिशवी' असा होतो. ठनकहमज हा शब्द इंग्लंडमध्ये सर्वप्रथम 1733 मध्ये वापरण्यात आला.

अर्थसंकल्पाची व्याख्या

1. 'अर्थसंकल्प म्हणजे एका वर्षातील आय आणि व्यय याचे ताळेबंद म्हणजेच अर्थसंकल्प होय.'
2. 'एका वर्षामध्ये शासनाने उत्पन्न आणि खर्च याचे बेरीजपत्रक म्हणजेच अर्थसंकल्प होय.'

अर्थसंकल्प 2012 – 2013

प्रणव मुखर्जी यांनी सादर केलेला अर्थसंकल्प सकारात्मक आहे असे म्हणावे लागेल. कारण मागील वर्षाच्या तुलनेत रक्कमेमध्ये 12 टक्क्यांनी घट करून भविष्यकाळात आपली अर्थव्यवस्था कोणत्या दिशेने वाटचाल करणार आहे. हे दाखविणारा अर्थसंकल्प प्रणव मुखर्जी यांनी मांडला. कंपनी कर, प्राप्तीकर व संपत्तीकरात प्रत्येक 14 टक्क्यांनी वाढ झाली. सेवाकरांच्या यादीत 17 सेवा वगळता इतर सर्व सेवांच्या समावेश केला आहे आणि सेवा कर दहा टक्कयांवरून बारा टक्कयांवर गेला आहे. उत्पादन शुल्काचा एकुण उत्पन्नातील वाटा हा नेहमीच लक्षणिय असतो आणि त्यामध्ये 22 टक्क्यांनी वाढ झालेली आपणास दिसते.

अर्थसंकल्पाची उदिष्टये :–

1. मागणी वाढुन विकासाला चालना देणे.
2. खाजगी गुंतवणुक वाढविणे.
3. कुपोषणाच्या समस्या दुर करणे.
4. काळापैसा भ्रष्टाचाराला आळा घालणे.

ठनकहमज 2012 – 2013

| आकडे हजार कोटीमध्ये | 2010 & 2011 प्रत्यक्ष | 2011 & 2012 अर्थसंकल्प | 2011 & 2012 सुधारित | 2012 & 2013 सुधारित |
|---|---|---|---|---|
| महसुली उत्पन्न | 788-8 | 789-9 | 767-0 | 935-7 |
| भांडवली उत्पन्न | 408-9 | 467-8 | 551-7 | 555-2 |
| एकुण उत्पन्न | 1197-3 | 1257-7 | 1318-7 | 1490-9 |
| योजनाबाहय खर्च | 818-3 | 816-2 | 892-1 | 969-9 |
| योजना खर्च | 379-0 | 441-5 | 426-6 | 521-0 |
| एकुण खर्च | 1197-3 | 1257-7 | 1318-7 | 1490-9 |
| महसुली तुट | 252-3 | 307-3 | 395-0 | 350-4 |
| वित्तिय तुट | 373-6 | 412-8 | 522-0 | 513-6 |
| प्राथमिक तुट | 139-6 | 144-8 | 246-4 | 193-8 |

Source: www.Indiabuget.com

एकुण खर्चामध्ये नियोजन खर्च आणि नियोजनबाहय खर्च, असे दोन भाग पडतात. नियोजन खर्चामध्ये प्रामुख्याने केंद्रीय योजना आणि केंद्रशासित प्रदेशासाठी असलेल्या योजनांचा समावेश आसतो. या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये नियोजन खर्चामध्ये 22 टक्क्यांनी वाढ दाखविली आहे. योजनाबाहय खर्चामध्ये प्रामुख्याने संरक्षण व तसेच विविध सामाजिक योजनावरील खर्च इत्यादींचा समावेश होतो. संरक्षण योजना व पोलिस खात्यावरील खर्च यावर अनुकमे 9 आणि 7 टक्के ऐवढी वाढ दिसते. मागील वर्षाच्या तुलनेत अनुदानाच्या रकमेमध्ये 12 टक्क्यांनी घट करून भविष्यकाळात आपली अर्थव्यवस्था कुठल्या दिशेने वाटचाल करणार आहे हे दाखवते.

अर्थमंत्र्यानी अर्थसंकल्प सादर करतांना अन्नसुरक्षा कायद्यासाठी देण्यात येणा—या अनुदानासाठी अजीबात हात आखडला नाही. श्री. नंदन निलेकणी यांच्या अध्यतेखाली स्थापण केलेल्या मोबाईल बेस्ट फर्टिलायझर मॅनेजमेंट सि. स्टिम संबंधित केलेल्या शिफारशी स्वीकारल्या आहेत. तसेच स्वयंपाकाच्या गॅस संबंधात पारदर्श पोर्टल्स सुरू केली असून त्यामुळे ग्राहक सेवा अधिक तत्पर होईल. अशी आशा आहे. अनुदानासंबंधी आणखी एक महत्वाचा निर्णय म्हणजेच, संपूर्ण अनुदान रोखीने देण्यात येणार आहे. यापुर्वी काही वेळा हे अनुदान ब्राइसच्या स्वरूपात देण्यात येत होते. वित्तिय तुट सन 2011—12 मध्ये जी. डी.पी. च्या 59 टक्के होती. या अर्थसंकल्पात ती 5.1 टक्के इतकी कमी होण ो अपेक्षित आहे. ही वित्तीय तुट भरून काढण्यासाठी सुमारे 4,79 लाख कोटी इतकी रक्कम बाजारातुन उभी केली जाणे अपेक्षित आहे. 11 व्या पंचवार्षिक योजनेमधील 99 टक्के योजना आंमलात आणल्या जातात. ही बाब लक्षणीय आहे. इकॉनॉमिक सर्व्हिसेसमध्ये कृषी, उद्योग, वीज, तंत्रज्ञान आदी क्षेत्रांचा समावेश होतो. त्यामध्ये फक्त दोन टक्कयांनीच वाढ झालेली दिसते. वास्तविक पाहता देशाच्या दिर्घकालीन विकास योजनांच्या दृष्टिने या खर्चावरील तरतुद असण्याची गरज आहे. संरक्षण व पोलिस खात्यावरील खर्च सध्या देशाला असल. ेले बाहय व अंतर्गत धोके लक्षात घेता वाढु शकतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात त्यासाठी केलेली आर्थिक तरतुद कमी पाडण्याची शक्यता आहे. या दोन्ही खात्यांच्या कार्यतत्परता वाढविण्यासाठी त्यांना आधुनिक शस्त्रे, दळणवळणाची साधणे इत्यादी गोष्टी आधिक प्रगत करण्याची गरज आहे.

गृहनिर्माण योजनाअंतर्गत प्रमुख शहरांमध्ये अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी वेगळा 'केडीट गॅरंटी ट्रस्ट फंड' निर्माण करण्यासाठी घोषणा अर्थमंत्र्यानी केली आहे. तरी देखील सर्व जंगम मालमत्तांच्या खरेदी — विक्रीवर टी.डी. एस. लावण्याची घोषणा केली असल्याने हा व्यवहार महाग होईल. अशी त्यांची किंमत ठरविणे यासाठी काही निर्णायक उपाय सरकार करणार आहेत. युरियाची किंमत कमी झाल्यास शेतक—यांना मोठा दिलासा मिळेल. विदर्भासाठी 300 त्यांनी किसान केडिट हे स्मार्ट कार्ड म्हणून वापरण्यात येणार आहे.

❖ करामध्ये केलेली तरतुद आणि परिणाम :—

प्राप्ती कर

तरतुद

1. दोन लाखापर्यंत प्रप्तीकर नाही. दोन ते पाच लाखापर्यंत दहा टक्के, पाच ते दहा लाखापर्यंत वीस टक्के आणि दहा लाखापूढे तीस टक्के.
2. बॅक आणि टपाल खात्यातील बचत खात्यावरील मिळणारे दहा लाख रूपयांपर्यतचे.
3. 1 एप्रिल 2012 नंतर दिलेल्या आयुर्विमा पॉलिसींना प्रीमीयम आणि मॅच्युरीटी रकमेवर बजावर मिळणार ;वार्षिम प्रीमीयम सम अॅश्युअर्ड रकमेच्या दहा टक्कयांपेक्षा कमीद्व
4. सोने दागिन्यांवरील खरेदी रोखीत आणि दोन लाख रूपयांपेक्षा जास्त असेल तर एक टक्का.

परिणाम

1. प्रत्येकाच्या करपात्र उत्पन्नानुसार करात 1,030 ते 22,660 रूपयांपर्यत करबचत.
2. करदात्यांची करबचत होणार.
3. पॉलीसी प्रीमियवरील वजावटीसाठी अधिक कडक नियम.
4. सोने दागिण्यांचे रोखी व्यवहार कमी होणार.

उत्पादन शुल्क

तरतुद —

1. उत्पादनशुल्क दर दहा टक्कयांवरून बारा टक्क्यांवर.
2. पॅकेण्ड सिमेंट एम.आर.पी.वर आधारित किंमतीच्या आवाळयात.
3. कारवरील उत्पादन शुल्कात वाढ.
4. सेनव्हॅट क्रेडीत चुकीने लागु केल्यास व्याजदर लागु नाही.
5. निर्यात असल्यास क्रेडीटचा परतावा मिळणार.

परिणाम —

1. भाववाढ होणार सरकारचा महसूल वाढणार.
2. किंमतीबाबतचे तंटे कमी होणार.
3. कारच्या किंमती वाढणार. पेटोल आणि डिझेल दोन्हीच्या किंमती वाढणार.
4. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा परिणाम रद्द करण्याच्या दृष्टीने पाउल. उद्योगाच्या बाजुने सुधारणा.
5. निर्यातदारांसाठी क्रेडीट परत मिळवण्याची प्रक्रिया सोपी.

सिमा शुल्क

तरतुद —

1. लक्झरी कारवरील सिमाशुल्कात वाढ.
2. सहा जीवनरक्षक औषधांना सीमाशुल्कात सवलत.
3. सीरीज, निडल्स, कॅथेटर्स आणि कॅन्युलेवरील सीमाशुल्क 25 टक्क्यांवर.

परिणाम —

1. लक्झरी कार महाग होणार.
2. जीवरक्षक औषधे स्वस्त होणार.
3. वैद्यकीय उत्पादने स्वस्त होणार.

सेवा कर

तरतुद

सेवा कर दहावरून बारा टक्क्यांवर.

1. निगेटिव्ह लिस्ट किंवा विशेष उल्लेख केलेल्या सेवा वगळता सर्व सेवांवर कर.
2. दर महिन्याला एक पाणी सेवा कर विवरणपत्र भरावे लागणार.
3. सेवा कराबाबत तंटानिवारण आयोगाची स्थापना.

परिणाम —

1. सरकारचा महसुल वाढणार. माल आणि सेवा कराच्या ;जीएसटीद्व दृष्टीने महत्वाचे पाउल महागाईही वाढणार.
2. जी.एस.टी.कडे महत्वाची वाटचाल सुरू सेवांवर कराबाबत दृष्टीकोणातही मोठा बदल सेवा कराची व्याप्ती वाढणार.
3. सेवा कर भरणा—याला सोपे जाणार.
4. तंट्यांची तंड लागणे सोपे जाणार.

कॉर्पोरेट कर

तदतुद

1. एखादया कंपनीच्या शेअरचे मुल्य भारतातील मालमत्तेवर आधारित असल्यास ती भारताबाहेरची असली तरी शेअरच्या हस्तांतरणावर कर लागण ार.
2. बजारमूल्यापेक्षा जास्त किंमतीचे शेअर दिल्यास अतिरिक्त रक्कम करपात्र ठरणार.

परिणाम

1. व्होडाफोनसारखे प्रकरण भविष्यात उदभवु नये यासाठी सरकारने उचललेले पाउल.
2. बाजारमुल्यापेक्षा जास्त शेअरद्वारे भांडवल उभारण्यांच्या व्यावहारांना आळा बसणार.

इतर कर

तरतुद —

1. कपन्यांव्यतिरिक्त इतरांना पर्यायी किमान कर 18.5 टक्के.
2. स्थावर मालमत्तेच्या हस्तांतराची रक्कम पन्नास लाख रूपयांपेक्षा ;शहरी भागद्व आणि ग्रामिण भागात वीस लाख रूपयांपेक्षा जास्त असल्यास एक टक्का टीडीएस लागू होणार.

परिणाम

1. ज्या करदात्यांनी विशिष्ट बजावटींचा दावा केला आहे त्यांना जास्त कर बसणार.
2. व्यवहारांवर देखदेख ठेवण्याच्या दृष्टीने उचललेले पाउल.

❖ प्राप्तीकरातील सुधारणा प्रणव मुखर्जी यांनी प्राप्तीकरामध्ये सुधारणा केल्याचे सांगितले. त्यामुळे प्राप्तीकरामध्ये सुधारणा होणे आवश्यकच आहे. परंतु त्यांनी हया सुधारणामध्ये कांतीकारक सुधारणांचा अभाव आणि दिखावु प्रस्तावांचा भरण ा असणे अपेक्षितच आहे.

1. करमुक्त उत्पन्नात वाढ —
   अर्थमंत्र्यांनी करमुक्त उत्पन्नाची मर्यादा 1 लाख 80 हजार रूपयांवरून वाढवून 2 लाख रूपये केली आहे. ही 2 लाख रूपयांची मर्यादा 60 वर्षे वयापर्यंतचे पुरूष व महिला करदात्यांनी 'जेंडर डिस्क्रिमिनेशन' संपवून टा.

कले आहे. 60 वर्षे पुर्ण झालेल्या सीनियर सिटीझनसाठी करमुक्त उत्पन्नाची मर्यादा पुर्वीप्रमाणेच अनुकमे 2 लाख 50 हजार रूपये व 5 लाख रूपये राहण ाार आहे.

2. करदरात बदल –
आता 5 लाख रूपयापर्यंत प्राप्तीकराचा दर 10 टक्के राहणार असून रूपये 5 ते 10 लाख या उत्पन्नाच्या स्लॅबला तो 20 टक्के व 10 लाख रूपयांवर 30 टक्के होणार आहे. यामुळे ज्या करदात्यांचे उत्पन्न 10 लाख रूपये आहे त्यांची रूपये 22 हजारांची करबचत होईल.

3. 10 हजारापर्यंत सेव्हिंग खाते व्याज मुक्त –
अर्थमंत्र्यांनी नवीन 30 टीटीए नावाचे कलम आणले आहे. बॅंक, पोस्ट, सरकारी बॅंकेत असणा–या बचत खात्याावरील रूपये 10 हजारापर्यंतच्या व्याजावर आता करदात्यांना कर भरावा लागणार नाही. 5 लाख रूपये पगाराचे उत्पन्न असलेल्या करदात्यांना रिटर्नमुक्ती जाहीर झाली असून, त्यासाठी हे कलम मोलाचे ठरले असते. पण अर्थमंत्र्यांनी हे कलम पुढील वर्षापासून लागु करण्याचा प्रस्ताव दिला असल्याने चालु वर्षासाठीची रि. टर्नमुक्ती दिखउच भासत आहे.

4. सोने, चांदी, दागिण्यावर टीसीएस –
1 जुलै, 2012 पासून 2 लाख रूपयांवर सोने, चांदी, दागिने रोखीत खरेदी केले तर त्यावर विक्रेता तुमच्याकडुन खरेदी किंमतीच्या एक टक्का इतका टीडीएस वसूल करेल असा प्रस्ताव आहे. थोडक्यात वस्तु एक टक्का महाग मिळेल. ही तरतुद एक टक्का इतक्या किरकोळ टक्केवारीमुळे निश्प्रभ्र ठरण्याची आणि विकेत्यांची कारकूनी कटकट मात्र वाढवणारी ठरले असे वाटते.

5. प्रिव्हेंटिव्ह मेडिकल चेकअप –
कलम 80 डी खाली आरोग्य विम्याच्या हप्त्याची वजावट मिळते. आता आरोग्य विम्याबरोबरच करदात्याने स्वतःच्या पती /पत्नीच्या अवलंबुन असलेल्या स्वतःच्या मुला/मुलीच्या किंवा पालकांच्या प्रिव्हेटिव्ह मेडिकल चेकअपसाठी केलेल्या खर्चाला 5 हजार रूपयांपर्यंतची वजावट करदात्याला मिळेल. गंमत अशी की, ही 5 हजार रूपयांची मर्यादा कलम 80 डी च्या एकुण मर्यादेतीलच एक भाग आहे दृ 80 डीची मर्यादा पुर्वीइतकीच राहणार आहे.

6. जेष्ठांची आगावू प्राप्तिकरापासून मुक्तता –
व्यावसायिक उत्पन्न नसणा–या जेष्ठ नागरिकांना आगावू प्राप्तीकरापासून मुक्तता देण्याची तरतुद कलम 80 डी प्रमाणेच दिखावू स्वरूपाची आहे. सध्या जवळपास प्रत्येक उत्पन्नात टीडीएस होत असतांना खरे तर अशी तरतुद अर्थसंकल्पाची शब्दसंख्या वाढवण्यापलीकडे अन्य कोणतेही काम करत नाही.

7. जेष्टं नागरिकाचे वय साठच –
मागील वर्षी करगननेसाठी जेष्ट नागरिकाचे वय 60 करतांना कलम 80 डी ;आरोग्य विमाद्ध 80 डीडीबी ;गंभीर आजारावरील खर्चद्ध 197 ए ;फॉर्म 15 जी, 15 एचद्ध सारख्या महत्वाच्या कलमात जेष्ठ नागरिकांच्या वयासंबंध ी दुरूस्ती करण्याचे राहून गेले होते. या कलमात जेष्ठ नागरिकांचे वय 65 च राहिले होते. अर्थमंत्र्यांनी ही 'डाफिटींग एरर' दुरूस्त करून जेष्ठ नागरिकांचे वय 60 वर्षे केले आहे.

8. घर, जमिनीतील भांडवली नफा –
36 महिन्याहुन अधिक काळ करदात्याकडे असलेले घर किंवा जमीन विक. ून किंवा हस्तांतरीत करून मिळाली. विकी रक्कम करदात्याने उत्पादन क्षेत्रातील लहान व मध्यम आकाराच्या कंपनीच्या इक्विटी शेअरमध्ये गुंतवली तर त्याला प्राप्तीकरात सवलत मिळावी असा अर्थसंकल्पात प्रस्ताव आहे. मात्र या गुंतवणुकीला चिकटलेले 'जर' 'तर' इतक्या गंभीर स्वरूपाचे आहेत की, ही सवलत देखील दिखावू स्वरूपाचीच आहे का याची शंका यावी.

9. एच.यु.एफ. नातेवाईक –
कलम 56 मध्ये 'नातेवाईक' या शब्दाची व्याख्या दिली आहे. नातेवाईक. ांकडून कितीही किंमतीची, केव्हाही, कोणत्याही स्वरूपातील भेट करमुक्त असते. नातेवाईक या शब्दाची व्याख्या कायदेकारांनी व्यक्तीला ;पदकप. अपकनंसद्ध डोळयांसमोर ठेवून लिहिली होती. आता या व्याख्येत हिंदू अविभक्त कुटुंबाचाही समावेश करण्याचा प्रस्ताव असल्याने एच.यु.एफ. कडून तीच्या सदस्याला 1–10–2009 पासून मिळणारी भेटही करमुक्त ठरेल.

10. जीएमआर पासून सावधान –
करदात्यांना गार करणारे जनरल अॅंटी – अॅव्हॉयशुरन्स रूल ;जीएमआरद्ध लागु झाल्याने आकमक करनियोजनाचे सादर करदात्याला आता महागात पडु शकते हे लक्षात घ्यावे.

निष्कर्ष
वरील दिलेल्या माहितीवरून आपल्याला असा निष्कर्ष काढता येईल की, अथ. 'संकल्प मांडतांना यामध्ये काही ठराविक राज्याचा विचार केलेला दिसतो. त्याचबरोबर अर्थसंकल्पामध्ये सेवाकरातच वाढ केलेली दिसते. याउलट बाकीच्या कोणत्याही करदरामध्ये वाढ केलेली दिसत नाही आणि त्यामुळे कृषीक्षेत्राचा विक. ास दर हा 4 टक्क्यावरून 2.50 टक्क्यांवर आलेला दिसतो. म्हणजेच याठिकाण ी कृषीक्षेत्राचा दर वाढायला पाहिजे तर याठिकाणी कृषीक्षेत्राचा दर ऋणात्मक झालेला दिसतो.

अर्थमत्री प्रणव मुखर्जी यांनी उत्पन्नावरील कर वाढवला आहे. आणि उत्पन्न करामध्ये सुधारणा केलेल्या दिसते. परंतु इतर करामध्ये कोणत्याही सुधारणा झालेल्या नाही. त्याचबरोबर 2012 – 13 च्या अर्थसंकल्प हा समतोल स्वरूपाचा अर्थसंकल्प आहे. त्याचबरोबर कृषीक्षेत्रासाठीही हा अर्थसंकल्प फायदेशीर अस. ताना आपणास दिसून येतो.

**STATEMENT of Union Budget of India 2012-13**

*विवरण I – भारत की समेकित निधि – राजस्व खाता – प्राप्तियां*

*STATEMENT I - CONSOLIDATED FUND OF INDIA - REVENUE ACCOUNT - RECEIPTS*

(करोड़ रुपए)(In crores of Rupees)

| | मुख्य शीर्ष Major Head | वास्तविक Actual 2010-2011 | बजट Budget 2011-2012 | संशोधित Revised 2011-2012 | बजट Budget 2012-2013 |
|---|---|---|---|---|---|
| A. TAX REVENUE | | | | | |
| *(a) Taxes on Income and Expenditure* | | *437960.89* | *524516.00* | *494359.00* | *563093.00* |
| Corporation Tax | 0020 | 298687.89 | 359990.00 | 327680.00 | 373227.00 |
| Taxes on Income Other Than Corporation Tax | 0021 | 139069.02 | 164526.00 | 166679.00 | 189866.00 |
| Hotel Receipts Tax | 0023 | 3.18 | ... | ... | ... |
| Interest Tax | 0024 | 3.74 | ... | ... | ... |
| Fringe Benefit Tax | 0026 | 167.98 | ... | ... | ... |
| Other Taxes on Income and Expenditure | 0028 | 29.08 | ... | ... | ... |
| *(b) Taxes on Property and Capital Transactions* | | *8000.99* | *8135.00* | *6292.00* | *7164.00* |
| Estate Duty | 0031 | 0.24 | ... | ... | ... |
| Taxes on Wealth | 0032 | 686.83 | 635.00 | 1092.00 | 1244.00 |
| Gift Tax | 0033 | 0.38 | ... | ... | ... |
| Securities Transaction Tax | 0034 | 7155.42 | 7500.00 | 5200.00 | 5920.00 |
| Banking Cash Transaction Tax | 0036 | 158.12 | ... | ... | ... |
| *(c) Taxes on Commodities and Services* | | *345363.59* | *398065.66* | *398931.59* | *505294.34* |
| Customs | 0037 | 135812.51 | 151700.00 | 153000.00 | 186694.00 |
| Union Excise Duties | 0038 | 137700.94 | 163549.66 | 150074.59 | 193729.34 |
| Sales Tax | 0040 | 0.23 | ... | ... | ... |
| Service Tax | 0044 | 71015.87 | 82000.00 | 95000.00 | 124000.00 |
| Other Taxes and Duties on | 0045 | 834.04 | 816.00 | 857.00 | 871.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Commodities and Services | | | | | |
| *(d) Taxes of Union Territories without Legislature* | | *1982.19* | *1973.22* | *2317.01* | *2310.45* |
| *GROSS TAX REVENUE* | | *793307.66* | *932689.88* | *901899.60* | *1077861.79* |
| *State's share excluded from the Consolidated Fund* | | *219302.81* | *263457.74* | *255413.63* | *301920.76* |
| **Tax Revenue of the Central Government** | | **574004.85** | **669232.14** | **646485.97** | **775941.03** |
| **B. NON-TAX REVENUE** | | | | | |
| *(a) Fiscal Services* | | *83.88* | *127.82* | *129.42* | *119.32* |
| Currency, Coinage and Mint | 0046 | ... | 45.00 | 45.00 | 35.00 |
| Other Fiscal Services | 0047 | 83.88 | 82.82 | 84.42 | 84.32 |
| *(b) Interest Receipts, Dividends and Profits* | | *83278.27* | *72445.57* | *84809.24* | *75383.23* |
| Interest Receipts | 0049 | 35286.69 | 29821.89 | 34687.21 | 25230.68 |
| Interest from State and Union Territory Governments | | 10362.91 | 10313.06 | 9899.63 | 9320.50 |
| Interest from Railways | | 3905.84 | 6734.72 | 5652.24 | 6676.07 |
| Other Interest Receipts | | 21017.94 | 12774.11 | 19135.34 | 9234.11 |
| Dividends and Profits | 0050 | 47991.58 | 42623.68 | 50122.03 | 50152.55 |
| *(c) Other NonTax Revenue* | | *175965.20* | *87302.42* | *81571.28* | *121209.55* |
| *(i) General Services* | | *23489.26* | *26172.48* | *29000.36* | *27554.73* |
| Public Service Commission | 0051 | 28.20 | 30.50 | 31.50 | 33.00 |
| Police | 0055 | 2876.80 | 3800.60 | 3401.00 | 3601.20 |
| Supplies and Disposals | 0057 | 96.92 | 108.00 | 117.42 | 108.00 |
| Stationery and Printing | 0058 | 23.12 | 20.50 | 26.00 | 26.00 |
| Public Works | 0059 | 244.59 | 251.00 | 181.00 | 181.00 |
| Other Administrative Services | 0070 | 2999.68 | 3312.29 | 3325.31 | 3574.45 |
| Contributions and Recoveries Towards Pension and Other Retirement Benefits | 0071 | 2572.19 | 3391.51 | 2719.35 | 3019.66 |
| Miscellaneous General Services | 0075 | 10315.40 | 11086.91 | 14951.98 | 12445.63 |
| *Defence Services* | | *4332.36* | *4171.17* | *4246.80* | *4565.79* |
| Defence Services - Army | 0076 | 2033.64 | 1695.62 | 1695.62 | 1869.64 |
| Defence Services - Navy | 0077 | 165.68 | 200.00 | 200.00 | 200.00 |
| Defence Services - Air Force | 0078 | 627.55 | 592.92 | 619.38 | 619.38 |
| Defence Services - Ordnance Factories | 0079 | 1457.83 | 1647.63 | 1696.80 | 1836.77 |
| Defence Services - Research and Development | 0080 | 47.66 | 35.00 | 35.00 | 40.00 |

विवरण I – भारत की समेकित निधि – राजस्व खाता – प्राप्तियां

***STATEMENT I - CONSOLIDATED FUND OF INDIA - REVENUE ACCOUNT - RECEIPTS***

*(करोड़ रुपए)(In crores of Rupees)*

| | मुख्य शीर्ष Major Head | वास्तविक Actual 2010-2011 | बजट Budget 2011-2012 | संशोधित Revised 2011-2012 | बजट Budget 2012-2013 |
|---|---|---|---|---|---|
| *(ii) Social and Community Services* | | *771.08* | *2353.90* | *2551.76* | *1371.55* |
| Education, Sports, Art and Culture | 0202 | 108.01 | 99.56 | 105.04 | 110.26 |
| Medical and Public Health | 0210 | 212.61 | 199.08 | 250.69 | 250.70 |
| Family Welfare | 0211 | 36.33 | 35.70 | 36.50 | 36.50 |
| Housing | 0216 | 119.66 | 101.93 | 142.50 | 143.21 |
| Urban Development | 0217 | 13.37 | ... | 0.05 | 0.05 |
| Information and Publicity | 0220 | 269.57 | 1903.77 | 334.94 | 808.31 |
| Broadcasting | 0221 | ... | ... | ... | ... |
| Labour and Employment | 0230 | 10.78 | 13.35 | 21.55 | 21.55 |
| Social Security and Welfare | 0235 | 0.74 | 0.51 | 1660.49 | 0.97 |
| Other Social Services | 0250 | 0.01 | ... | ... | ... |
| *(iii) Economic Services* | | *247288.98* | *166999.94* | *155561.00* | *226841.38* |
| Crop Husbandry | 0401 | 131.35 | 145.06 | 145.07 | 159.58 |
| Animal Husbandry | 0403 | 14.81 | 13.85 | 16.65 | 16.15 |
| Dairy Development | 0404 | 292.91 | 341.70 | 341.70 | 352.00 |
| Fisheries | 0405 | 1.89 | 2.28 | 2.59 | 2.59 |
| Forestry and Wild Life | 0406 | 7.67 | 7.00 | 23.00 | 23.00 |
| Plantations | 0407 | 0.10 | 1.05 | 0.10 | 0.10 |
| Food,Storage and Warehousing | 0408 | 2.41 | 2.90 | 3.42 | 4.01 |
| Agricultural Research and Education | 0415 | 0.04 | ... | ... | ... |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Other Agricultural Programmes | 0435 | 14.41 | 15.50 | 15.50 | 16.50 |
| Major and Medium Irrigation | 0701 | 15.23 | 14.00 | 30.00 | 30.00 |
| Minor Irrigation | 0702 | 0.60 | 0.70 | 0.70 | 0.70 |
| Power | 0801 | 2396.60 | 2693.14 | 2789.05 | 2881.46 |
| Petroleum | 0802 | 9026.43 | 10031.00 | 12058.91 | 12671.42 |
| Coal and Lignite | 0803 | 43.43 | 2.03 | 2.50 | 0.50 |
| Non-Conventional Sources of Energy | 0810 | 0.27 | 0.40 | 0.43 | 0.50 |
| Village and Small Industries | 0851 | 25.98 | 28.76 | 33.98 | 33.83 |
| Industries | 0852 | 4058.39 | 1532.32 | 1629.80 | 1769.23 |
| Non-Ferrous Mining and Metallurgical Industries | 0853 | 23.10 | 25.75 | 26.50 | 27.50 |
| Other Industries | 0875 | 237.54 | 312.00 | 432.47 | 366.73 |
| Ports and Light Houses | 1051 | 203.90 | 172.00 | 182.00 | 191.50 |
| Shipping | 1052 | 65.68 | 59.10 | 62.55 | 59.55 |
| Civil Aviation | 1053 | 32.60 | 38.50 | 1.86 | 1.50 |
| Roads and Bridges | 1054 | 2338.99 | 2209.00 | 3161.21 | 3681.00 |
| Road Transport | 1055 | 1.38 | ... | ... | ... |
| Other Transport Services | 1075 | ... | ... | ... | ... |
| Postal Receipts | 1201 | 6962.33 | 7517.70 | 7522.02 | 7793.31 |
| Other Communication Services | 1275 | 120547.63 | 29648.33 | 16550.83 | 58217.33 |
| Atomic Energy Research | 1401 | 43.98 | 40.26 | 42.44 | 43.00 |
| Other Scientific Research | 1425 | 824.42 | 498.32 | 700.87 | 682.57 |
| Tourism | 1452 | 5.44 | 5.50 | 8.00 | 8.50 |
| Foreign Trade and Export Promotion | 1453 | 104.11 | 100.00 | 128.70 | 129.01 |
| Civil Supplies | 1456 | 0.69 | 0.04 | 0.04 | 0.04 |
| Other General Economic Services | 1475 | 3183.65 | 2148.50 | 3001.33 | 1984.38 |
| Railways Revenue as per Railway Budget | | 96681.02 | 109393.25 | 106646.78 | 135693.89 |

## REFERENCES

1. कोळंबे रंजन ;2011–12द्ध भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाषन 2. पाटील आनंद ;;2011–12द्ध ;केंद्रीय अर्थसंकल्प 2012–13 स्टडी सर्कल. पबलिकेषन पूणे 3. प्रतियोगीता साहित्य सिरीज ;2011–12द्ध 4. प्रतियोगीता दर्पण ;हिंदीद्ध ;2011–12द्ध न्वांत च्नइसपबंजपवद ण 2ध11 ।ए ूकमीप ठपउं छंहंतए ।ळत्।. 282 002 5. नइतीउंदलं ज्ञण्छण ;2012द्ध ैवनजीमतद म्बवदवउपेजश प्दजमतदंजपवदंस श्रवनतदंस ठंदहसवत प्दकपं 6. थ्पदंदबम डपदपेजमत ळवअजण वि प्दकपं ैतपण् च्तंदंअ डनींतरप च्तमेपकमदज ैचममबी वद न्दपवद ठनकहमज कंजमक 16 डंत 2012 7. www.Indiabudget.com